
वाचनाचा तास

लेखिका: ॲन

मराठी: अश्विनी बर्वे



वाचनाचा तास


हातातलं काम टाकून वाचनाची वेळ





शाळेतले वातावरण रोजच्या सारखंच होतं.





श्रीमती फ्रीमन यांच्या वर्गात मुलं दगडाचे सूप करत आहेत.
डेनिस त्यात गाजर आणून टाकतो आणि विचारतो,
“वाचनाची वेळ झाली का?”

श्री. वोंग यांच्या वर्गात सागरी जीवाबद्दलचा अभ्यास चाललेला आहे.

ख्रिस स्कुबा डायव्हर आहे.

तो विचारतो, “वाचनाचा तास कधी आहे?”





मिस. अंगली यांच्या वर्गात सगळेजण *मे फ्लॉवर*
जहाजवर प्रवास करत आहेत..
शॅरान मळमळ होत असल्याचा अभिनय करत आहे आणि मग ती
उलटी करते. जसे यात्रेकरू करतात अगदी तसे.
“आता वाचनाची वेळ आहे का?” ती विचारते.

मिस. मलिगनच्या वर्गात मुले राष्ट्राध्यक्षांवर आधारित
एक नाटक सादर करत आहेत.
जोस हा जॉर्ज वॉशिंग्टनची भूमिका साकारत आहे.
पण त्याचा विग खूप मोठा आहे.
"पुस्तकांची वेळ केव्हा येईल?" तो विचारतो.



संगीत शिकण्याच्या वर्गात मुलं ड्रम वाजवण्यात,
बासरी वाजवण्यात, वाद्य वाजवण्यात व्यग्र आहेत.
श्री. गार्सिया यांना कान बंद करण्यासाठी
काही घालण्याची गरज आहे.



आणि जिमच्या वर्गात मुलं उड्या मारण्यात आहेत.





चित्रकलेच्या वर्गात ॲनी चित्र रंगवत आहे
आणि जॉन मातीपासून काही बनवत आहे.



स्वयंपाकघरातील
भट्टीमध्ये बिस्किटे
भाजण्याचा सुगंध येत
आहे.

प्राचार्यच्याक्षात
श्री. चार्ल्स,
जिमीला रागावत आहेत.





मेकॅनिक मार्टिन शाळेच्या
तळघरात नळ बदलत आहे.

ग्रंथालयात पुस्तके
खाली पडत आहेत.





विज्ञानाच्या
प्रयोगशाळेमध्ये
ज्वालामुखीच्या स्फोटाचे
मॉडेल आहे.



संगणकाच्यावर्गात पीट
चुकीची डिस्क लावत आहे.



प्रथमोपचारच्या खोलीत मध्ये
नर्स तमिका, एका लहान
मुलीला मलमपट्टी करत आहे.

इतर शाळेसारखाच या शाळेचाही हा एक व्यग्र दिवस आहे.



सर्व सोडून द्या! आता वाचनाची वेळ झाली आहे.




सर्व कामं सोडून फक्त वाचनाची वेळ.



स्वतःचे आवडते पुस्तक वाचा!



जेव्हा भांड्यात सूप उकळतहोते तेव्हाच
श्रीमती. फ्रीमनच्या वर्गातील मुलांनी
चित्रांची पुस्तके हातात घेतली आहेत.



जेव्हा शार्क स्वतःचा प्रचंड जबडा उघडत होता तेव्हाच
पण श्री वौंगच्या वर्गातल्या मुलांचे नाक त्यांच्या
आवडत्या पुस्तकात होते.







जेव्हा मे *फ्लॉवर जहाज* हळूहळू समुद्रात जात होते तेव्हाच
मिस अंगलीच्या वर्गातली मुले वाचन करायला बसली.

जेव्हा जोसचा विग खाली पडला तेव्हाच

श्रीमती. मलिगनच्या वर्गातल्या मुलांचे चेहरे पुस्तकाच्या आत होते.



संगीत कक्षात आता बासरीचा, ड्रमचा आवाज नाही. श्री गार्सियांनी त्यांच्या कानातले बोळे काढून टाकले आहेत..





जिममध्ये आता शांतता आहे.

चित्रकलेच्या वर्गात चित्र अपूर्ण आहे.
आणि ओली माती कोरडी झाली आहे.



स्वयंपाकघराची भट्टी आता थंड आहे.



प्राचार्य सरांनी आता रागावणे बंद केले आह .



मेकॅनिकने आता दुरुस्तीचे काम बंद केले आहे.



ग्रंथपालाने पुस्तके लावणे बंद केले.



ज्वालामुखीमधून धूर येणे बंद झाले आहे.



संगणक आता बंद केला आहे.



नर्स तामिकाने मलमपट्टी करणे थांबवले आहे.



शाळेमध्ये प्रत्येकजण पुस्तक वाचते आहे.




सर्व सोडून फक्त पुस्तक वाचन!



सर्व कामं सोडून फक्त वाचन.



असे परत उद्या होणार आहे.....



.... आणि परवा पण, दिवस खूप ...



.... आणि त्यानंतर खूप ...

सर्व कामं सोडून फक्त वाचन .



शाळेतील पुस्तक वाचन तासाचे महत्त्व सर्वांनाच माहीत आहे .

DEAR TIME मध्ये प्रत्येकजण आपापली आवडती पुस्तके वाचतो.